**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**
**अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**
**एकदिवसीय कार्यशाळेचा अहवाल**

<table>
<tr><td>शीर्षक</td><td colspan="2">महाविद्यालयानी प्रशासकीय कामकाज आणि ई-गव्हर्नन्स या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा</td></tr>
<tr><td>समिती<br>अग्रणी महाविद्यालय</td><td>अध्यक्षा<br>मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे</td><td>तज्ज्ञ मार्गदर्शक<br>मा. डॉ. मिलिंद कुरणे, श्री. महेश निलजे आणि श्री. अक्षय डोंगरे</td></tr>
<tr><td colspan="3">वार व दिनांकः सोमवार, दि. ३१ डिसेंबर २०१८, वेळः सकाळी ९ ते दुपारी ४<br>स्थळः सेमिनार हॉल</td></tr>
<tr><td colspan="3">सहभागः पाच महाविद्यालयांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ मार्गदर्शकः ०३, प्रशासकीय कर्मचारीः २१, समिती सदस्यः ०५, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई आणि विद्यार्थी स्वयंसेवकः ०८; एकूणः ३७</td></tr>
<tr><td colspan="3">उद्देशः १. महाविद्यालयीन प्रशासनातील नव्या अटी, शर्ती समजाऊन सांगणे; २. ई- गव्हर्नन्स ही संकल्पना स्पष्ट करणे; ३. ई-गव्हर्नन्सचे प्रत्यक्ष स्वरुपामध्ये सादरीकरणे करणे</td></tr>
<tr><td colspan="3">संक्षिप्त अहवाल<br>विद्यार्थ्यांबरोबरच, उच्च शिक्षणासंदर्भातील सर्व घटकांमध्ये वैचारिक आदानप्रदान व्हावे हा सुध्दा अग्रणी महाविद्यालय या संकल्पनेचा उद्देश आहे. त्यान्वये, सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.<br>सर्वप्रथम, संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन, तसेच दीपप्रज्वलन करुन मान्यवरांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर, कार्यक्रम समन्वयक डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी कार्यशाळेची संकल्पना आणि उद्देश स्पष्ट केले. तसेच, तज्ज्ञ मार्गदर्शकांची ओळख उपस्थितांना करुन दिली. पुढे प्राचार्यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन, त्यांचा सत्कार करण्यात आला.<br>कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक मा. डॉ. मिलिंद कुरणे यांनी प्रारंभ केला. महाविद्यालयीन प्रशासकीय कामकाजामधील ताज्या अटी/शर्ती हा त्यांचा विषय होता. यासाठी त्यांनी प्रथम उत्तम प्रशासनाची चौकट मांडली. पुढे, सर्व प्रकारच्या रेकॉर्डस कसे अद्ययावत ठेवायचे हे स्पष्ट केले. यासदंर्भात, तसेच, रजेच्या संदर्भातील नविन कोणत्या अटी आहेत हे ही समजाऊन दिले. पुढे, दुसऱ्या सत्रामध्ये, मा. श्री. महेश निलजे यांनी मार्गदर्शन केले. ई-गव्हर्नन्सः संकल्पना हा त्यांचा विषय होता. यामध्ये, त्यांनी ही संकल्पना स्पष्ट केली. तिचे स्वरुप, व्याप्ती सांगीतली. तसेच, त्यांनी, यासंदर्भात तयार केलेल्या वेबसाईट आणि मोबाईल ॲप्लीकेशनचीही माहिती दिली. त्यानंतर, तिसऱ्या सत्रात श्री. अक्षय डोंगरे यांनी प्रत्यक्षामध्ये, ई-गव्हर्नन्सचे कार्य कसे चालते हे स्पष्ट केले. ऑफिस ऑटोमेशनच्या माध्यमातून हे स्पष्ट झाले. यातील विविध मॉड्यूल्सचा त्यांनी परिचय करुन दिला.<br>अशा प्रकारे, या तिन्ही सत्रातील मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकांनंतर, तज्ज्ञांनी उपस्थित प्रशासकीय कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी कर्मचाऱ्यांनी विविध प्रश्न विचारले. त्यांचे यथायोग्य समाधान तज्ज्ञांनी केले. त्यानंतर, काही कर्मचाऱ्यांनी एकंदर कार्यशाळेबाबत आपले मनोगत व्यक्त केले.<br>शेवटी अध्यक्षीय समारोपामध्ये मा. श्री. आर. आर. मुधोळे यांनी, सर्व व्याख्यानांवर आपले अभ्यासपूर्ण मनोगत सादर केले. अशा प्रकारच्या कार्यशाळेंचे महत्व अधोरेखित केले. शेवटी डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.<br>त्यानंतर, भोजनाचा कार्यक्रम होऊन, प्रमाणपत्राचे वाटप झाले. यानंतर कार्यशाळेचा समारोप झाला.<br>या कार्यशाळेची तांत्रिक बाजू प्रा. निलेश कांबळे यांनी सांभाळली. तर प्रशासकीय बाजू श्री. संदिप इथापे यांनी सांभाळली. एकंदर व्यवस्थापकीय सहकार्य श्री. सचिन कांबळे, श्री. तानाजी धनगर या शिपाई वर्गाने आणि श्री. दत्तात्रय कोळी, श्री. महेश चौगुले, कु. निलावती वडेर इ. या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दिले. भोजनव्यवस्थेचे सहकार्य श्री. आवळे (कोरोची) यांनी केले.</td></tr>
<tr><td colspan="3">उद्देशांची परीपूर्तीः १. महाविद्यालयीन प्रशासनातील नव्या अटी, शर्ती स्पष्ट झाल्या २. सुलभ, वेगवान आणि पर्यावरणपूरक प्रशासनासाठी ई- गर्व्हर्नन्सचे कसे महत्व आहे हे कळले; ३. प्रत्यक्ष सादरीकरणामुळे, ई-गव्हर्नन्सचे कार्य कसे चालते हे स्पष्ट झाले</td></tr>
</table>

# कार्यशाळेची क्षणचित्रे



१. उद्घाटन समारंभ



२. प्रास्ताविक: डॉ. निरंजन कुलकर्णी (समन्वयक)



३. पाहुण्यांचे स्वागत




४. तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. मिलिंद कुरणे



५. तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. महेश निलजे



६. तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. अक्षय डोंगरे







७ ते ९. कार्यशाळेतील सहभागी प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मनोगत



१०. समारोपावेळी मनोगत व्यक्त करताना मा. श्री. आर. आर. मुधोळे (अधिक्षक)

**।। दुरितांचे तिमिर जावो।।**

**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**

**शिवाजी विद्यापीठांतर्गत अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**

**एकदिवसीय कार्यशाळा**

# महाविद्यालयीन प्रशासकीय कामकाज आणि ई-गव्हर्नन्स

**अध्यक्षा: मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे**

**तज्ज्ञ मार्गदर्शक: मा. डॉ. मिलिंद कुरणे, मा. श्री. महेश निलजे, मा. श्री. अक्षय डोंगरे**

## कार्यक्रमपत्रिका

**दिनांक: ३१ डिसेंबर २०१८ वेळ: सकाळी ९.०० ते दुपारी ४.३० स्थळ: सेमिनार हॉल**

| वेळ | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|
| ९ ते ९.३० | **नोंदणी** | |
| ९.३० ते १० | **उद्घाटन समारंभ** | |
| | **स्वागत आणि प्रास्ताविक** | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | **माननीय पाहुण्यांची ओळख आणि त्यांचा सत्कार** | |
| १० ते ११.३० | **पहिले सत्र-महाविद्यालयीन कामकाजासंबधी नवे नियम व शासकीय निर्णय** | मा. डॉ. मिलिंद कुरणे (अधिक्षक, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर)यांचे मार्गदर्शन |
| ११.३० ते १ | **दुसरे सत्र- महाविद्यालयीन प्रशासकीय कामकाज पध्दती** | मा. श्री. महेश निलजे (अधिक्षक, यादव कॉलेज, पेठवडगाव) यांचे मार्गदर्शन |
| १ ते १.४५ | **भोजन** | |
| १.४५ ते ३.१५ | **तिसरे सत्र-ऑफिस ऑटोमेशन** | मा. श्री. अक्षय डोंगरे (रिजनल सेल्स मॅनेजर, बियाणी टेक्नॉलॉजी, कोल्हापूर) यांचे मार्गदर्शन |
| ३.१५ ते ४ | **प्रश्नोत्तरे आणि चर्चा** | सहभागी प्रशासकीय कर्मचारी |
| ४ ते ४.३० | **समारोप समारंभ** | |
| | **मनोगत** | उपस्थित सहभागी प्रशासकीय कर्मचारी वर्ग आणि प्राध्यापक |
| | **अध्यक्षीय मनोगत** | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे |
| | **आभार** | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | **प्रमाणपत्र वितरण** | |